शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था /नवीन अभ्यासक्रम सुरु करणे/ प्रवेशक्षमता वाढ/ पीआयओ करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. मान्यता -२०१४ / प्र.क्र.५२ /तांशि-५**
**मंत्रालय विस्तार भवन,मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांकः २५ जुलै, २०१४.**

**संदर्भः-** १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/२०१४/४१८, दिनांक १२.०५.२०१४
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/मान्यता/२०१४/५५७, दिनांक २१.०६.२०१४

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्यां नवीन संस्था /नवीन अभ्यासक्रम सुरु करणे/ प्रवेशक्षमता वाढ/ पीआयओ करण्यास शासन मान्यता देण्याबाबत शासन मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी राज्यात सुरु असलेल्या औषधनिर्माणशास्त्र / अभियांत्रिकी तंत्रनिकेतनातील नवीन पदविका संस्था सुरु करणे/ नवीन अभ्यासक्रम / प्रवेशक्षमता बदल करण्यास **परिशिष्ट A** (Annexure A) व **परिशिष्ट B** (Annexure B) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच

संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे .

५) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पुर्ण वेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रीक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडुन शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा.प्रयोगशाळा, वाचनालय, क्लासरुम इ.) करणे आवश्यक आहे.

९) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा .सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) सदर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) या शासन निर्णयाद्वारे ज्या नवीन संस्थांना व ज्या अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आहे, अशा ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले आहेत व ज्या संस्थांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे, अशा नवीन संस्थांना / अभ्यासक्रमांना राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही. त्याकरीता संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी संबंधित संस्थांकडून तशा आशयाचे नोटराईज शपथपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानंतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

१५) अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे / अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काय परिस्थिती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील, कारण त्यांनी तसे लेखी बंधपत्र (Affidavit) दिलेले आहे.

याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेत स्थळावर ठेवण्यात आला असून संकेतांक क्रमांक **२०१४०७२३१६३८२३७८०८** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( विजय चांदेकर )**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पू), मुंबई - ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
४. संबंधित संस्था (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

प्रत माहितीसाठी :-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.

ANNEXURE A

List of New Institutes for A.Y. 2014-15

(शासन निर्णय क्र. मान्यता-2014/प्र.क्र.52/तांशि-5,दि. 23.7.2014.

| Sr. No. | CURRENT APPLICATION NUMBER | DISTRICT | APPLICATION TYPE | INSTITUTE NAME | ADDRESS | INSTITUTION TYPE | PROGRAMME | SHIFT | LEVEL OF COURSE | FULL TIME PART TIME | AFFILIATING BODY | NAME OF COURSE | APPROVED INTAKE 2013-14 | APPROVED INTAKE 2014-15 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-2061229791 | AMRAVATI | New Institute | KIRTI POLYTECHNIC | UTTAM NAGAR, TQ.AMRAVATI, DIST.AMRAVATI (M.S.)444606 | Unaided - Private | ENGINEERING AND TECHNOLOGY | 1st Shift | DIPLOMA | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education | CIVIL ENGINEERING | 0 | 60 |
| | | | | | | | | | | | | COMPUTER ENGINEERING | 0 | 60 |
| 2 | 1-2123888801 | SOLAPUR | New Institute | GANDHI NATHA RANGJI DIGAMBER JAIN JANMANGAL PRATISHTHAN | 13, BUDHWAR PETH, JAIN BOARDING, BALIVES, SOLAPUR-413002 | Unaided - Private | PHARMACY | 1st Shift | DIPLOMA | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 0 | 60 |